# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १८४ वा ❑ सोमवार दि.०८ सप्टेंबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## यूजीसी प्रमाणेच प्राथमिक शिक्षकांना टीईटी परीक्षेपासून सूट मिळावी!

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

वरिष्ठ महाविद्यालयात किंवा उच्च शिक्षण संस्थांमध्ये सहाय्यक प्राध्यापक पदासाठी नेट सेट ही पात्रता परीक्षा अनिवार्य होती.मात्र आता विद्यापीठ अनुदान आयोगाने उच्च शिक्षण संस्थांमध्ये आता सहायक प्राध्यापक होण्यासाठी

यूजीसीची नेट परीक्षा उत्तीर्ण होण्याची गरज नसल्याचे स्पष्ट केले आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी, उच्च शिक्षण संस्थांमध्ये प्राध्यापक भरती आणि पदोन्नतीसाठी यूजीसीने मार्गदर्शक तत्त्वांचा मसुदा जारी केला आहे. त्यानुसार सहायक प्राध्यापक भरतीसाठी नेट परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक नाही.याच धर्तीवर शालेय शिक्षण विभागाने प्राथमिक शिक्षकांसाठी शिक्षक पात्रता परीक्षा टीईटी मधून सूट द्यायला पाहिजे.

शालेय शिक्षण विभागाने प्राथमिक शिक्षकांसाठी टीईटी देणे अनिवार्य केल्याचा आदेश १३ फेब्रुवारी २०१३ रोजी काढला होता. या आदेशानुसार २०१३ पूर्वी नियुक्त झालेले शिक्षक देखील आता टीईटी उत्तीर्ण करणे बंधनकारक केले आहे.आता सर्वोच्च न्यायालयाने त्यापूर्वी नोकरीला लागलेल्या शिक्षकांसाठी देखील 'टीईटी'चे बंधन घातले आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार प्राथमिक शाळांवरील ज्या शिक्षकांचे वय ५३ वर्षे आहे, त्यांना दोन वर्षात 'टीईटी' उत्तीर्ण व्हावीच लागणार आहे. प्राथमिक शाळांवरील ५३ वर्षांपर्यंतच्या सर्वच शिक्षकांना दोन वर्षात 'टीईटी' उत्तीर्ण करावी, अन्यथा त्यांच्यावर सक्तीच्या सेवानिवृत्तीची कारवाई करावी, असेही आदेश आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामुळे महराष्ट्र, उत्तरप्रदेश, पश्चिम बंगालसह बहुतेक राज्य सरकार पुढे पेच निर्माण झाला आहे. शालेय शिक्षण विभागाने शासनाला सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही करण्यासंदर्भात शासनाकडून मार्गदर्शन मागविले आहे.

अनेक वर्षापासून सेवा बजावत असलेल्या शिक्षकांना अर्ध्या नोकरी नंतर पुन्हा परीक्षा द्यावी लागणार आहे या निर्णयामुळे शिक्षक वर्गांमध्ये नाराजी पसरली असून अर्धी नोकरी झाल्यानंतर पुन्हा परीक्षा द्यायची का असा सवाल शिक्षक संघटना उपस्थित करत आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगासारखे उच्च शैक्षणिक संस्था जर प्राध्यापकांना नेट–सेट या पात्रता परीक्षा पासून सूट देत असेल तर शालेय शिक्षण विभागाने देखील आधीच कार्यरत असलेल्या शिक्षकांना टीईटी परीक्षेतून सूट द्यायला हवी.

भारतातील उच्च शिक्षण क्षेत्रात प्राध्यापक पदासाठी राष्ट्रीय पात्रता परीक्षा किंवा राज्यस्तरीय पात्रता परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे. असं असताना अनेक एम.फील धारक प्राध्यापक दीर्घकाळापासून वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये नोकरी करत असून त्यांना एमफील अर्हतेचा लाभ मिळत नव्हता. मात्र, आता विद्यापीठ अनुदान आयोगाने एम.फिल पात्रता धारक प्राध्यापकांना त्या अर्हतेचा लाभ देण्याचा प्रश्न निकाला काढलाय. त्यानुसार राज्यातील एक हजार ४२१ प्राध्यापकांना एम.फिल अर्हतेच्या तारखेपासून नेट/सेट परीक्षेतून सूट देण्यास आयोगाने अखेर मान्यता दिली आहे.

१९९३ पूर्वी प्राध्यापक पदासाठी एम.फिल पात्रता ग्राह्य धरली जात होती. त्यानंतर जून २००६ ते जुलै २००९ या कालावधीत थेट नियुक्त प्राध्यापकांना एम.फिल पात्रता ग्राह्य धरली गेली. मात्र, १९९४ ते २००९ दरम्यान एम.फिल केल्यानंतर सेवेत असलेल्या अनेक प्राध्यापकांना या पात्रतेचा लाभ मिळत नव्हता. या प्राध्यापकांचा हा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित होता.

दरम्यान, राज्यातील या प्राध्यापकांचा प्रश्न आणि त्यासंबंधित तांत्रिक अडचणी आणि त्यांच्यावर होत असलेला अन्याय विद्यापीठ विकास मंचाने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निदर्शनास आणून दिला होता. यात एक समानता असावी आणि त्यासाठी एक वेळची सवलत मिळावी, अशी मागणी मंचाने केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्याकडे केली होती.

त्यानंतर आता विद्यापीठ अनुदान आयोगाने राज्यातील १,४२१ प्राध्यापकांना एम.फिल. पात्रता अर्हतेच्या तारखेपासून नेट/सेटमधून सूट देण्यास मान्यता दिली आहे. आयोगाने या संदर्भात राज्य सरकारला पत्र पाठवले आहे. त्यामुळे आता अशा दीर्घकाळ सेवेत असूनही लाभापासून वंचित असलेल्या या प्राध्यापकांनी दिलासा मिळाला आहे.

यूजीसीने जारी केलेल्या

नवीन मार्गदर्शक तत्त्वांमध्ये, उमेदवारांना इतर विषयांमधून नेट करण्याचे स्वातंत्र्य आहे. तसेच, नेटशिवाय, थेट पीएच.डी. केलेले उमेदवारही सहायक प्राध्यापक भरतीसाठी अर्ज करू शकतील.असाच दिलासा शालेय शिक्षण विभागाने अनेक वर्षांपासून कार्यरत असलेल्या शिक्षकांना द्यायला पाहिजे.

विशेष म्हणजे नोकरी पूर्वीच अनेक उमेदवारांनी भरती प्रक्रिया आधीच टीईटी उत्तीर्ण करूनच नोकरी मिळवली आहेत तरी देखील नियुक्तीनंतर पुन्हा परीक्षा घेण्याची सक्ती करणे हे संयुक्तिक व योग्य आहे का ?याचा विचार शिक्षण विभागाने करायला पाहिजे. भरती प्रक्रियेतच्या आधी सीईटीला अनिवार्य पात्रता मानले जाते. उमेदवारांची निवड ही टीईटी उत्तीर्ण झाल्यानंतरच केली जाते तरीदेखील नोकरी दाखल झाल्यानंतर पुन्हा परीक्षा घेणे न्यायसंगत आहे का? याचा न्यायालयाने देखील विचार करायला पाहिजे .

राज्यात प्राथमिक आणि उच्च प्राथमिक शाळांची संख्या ८७ हजार ४४० आहे. या शाळांमध्ये ४ लाख ७९ हजार शिक्षक शिकवतात. त्यातील अंदाजे १ लाख ४९ हजार शिक्षकांना टीईटी परिक्षा द्यावी लागणार आहे. धक्कादायक म्हणजे, ५३ वर्ष वय असणाऱ्या शिक्षकांन अवघ्या २ वर्षात टीईटी उत्तींण व्हावं लागणार आहे.. नाहीतर सक्तीच्या सेवानिवृत्तीची कारवाई या शिक्षकांवर केली जाईल. त्यामुळे उतारवयात शिक्षकांना पुन्हा परिक्षेला समोरं जावं लागणार आहे.. दरम्यान शिक्षकांना पदोन्नतीच्या प्रत्येक टप्प्यावर टीईटीची अट घालण्यात आल्याने सेवाज्येष्ठ शिक्षकांऐवजी टीईटी उत्तीर्ण असलेला ज्युनिअर शिक्षक मुख्याध्यापक होणार आहे. ज्यामुळे शिक्षक संघटनांकडून आणि शिक्षकांकडून या निर्णयाला विरोध केला जातोय.

# शिक्षकांचे योगदान भारताला सुपर पॉवर बनवेल : द्रौपदी मुर्मू

## राष्ट्रपतींच्या हस्ते महाराष्ट्रातील ६ शिक्षकांना 'राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार'

**ज्योतिर्मय साहित्य**

**दिल्ली** – राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते शुक्रवारी महाराष्ट्रातील सहा शिक्षकांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. यात डॉ. शेख मोहम्मद वकिउद्दीन शेख हमीदोद्दीन (जिल्हा परिषद हायस्कूल, अर्धापूर, नांदेड), सोनिया विकास कपूर (एटॉमिक एनर्जी सेंट्रल स्कूल नं. २, मुंबई), डॉ. संदीपन गुरुनाथ जगदाळे (दयानंद कॉलेज ऑफ आर्ट्स, लातूर), डॉ. नीलाक्षी जैन (शाह अँड अँकर कच्छी अभियांत्रिकी महाविद्यालय, मुंबई), प्रा. पुरुषोत्तम पवार (एस. व्ही. पी. एम. इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड इंजिनिअरिंग, बारामती) आणि कौशल्य विकास क्षेत्रातील अनिल रामदास जिभकाटे (संत जगनाडे महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नागपूर) यांचा समावेश आहे.

देशातील ४५ शालेय शिक्षकांचा सन्मान द्रौपदी मुर्मू यांनी देशातील ४५ शालेय शिक्षक, २१ उच्च शिक्षण आणि १६ कौशल्य विकास क्षेत्रातील शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. शिक्षण मंत्रालयाच्या शालेय शिक्षण व साक्षरता विभागातर्फे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान, शिक्षण राज्यमंत्री डॉ. सुकांत मजुमदार, जयंत चौधरी, शिक्षण मंत्रालयाचे सचिव संजय कुमार, कौशल्य विकास आणि



उद्योजकता मंत्रालयाचे सचिव देबाश्री मुखर्जी उपस्थित होते.

या पुरस्काराचा उद्देश शिक्षकांचे समर्पण, नावीन्यपूर्ण कार्यपद्धती आणि विद्यार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा गौरव करणे हा आहे. मागील काही वर्षांपासून या पुरस्काराची व्याप्ती वाढविण्यात आली आहे. शिक्षकांचे योगदान भारताला सुपर पॉवर बनवेल असे यावेळी बोलताना द्रौपदी मुर्मू यांनी सांगितले.

त्यांनी 'आचार्य देवो भव' असा शिक्षकांचा उल्लेख करीत, त्यांचे समाजातील सर्वोच्च स्थान अधोरेखित केले. शिक्षक मुलांमध्ये आत्मसन्मान आणि सुरक्षितता जागवतात. त्यांचे यश हेच शिक्षकांचे खरे बक्षीस आहे, असे त्या म्हणाल्या. सावित्रीबाई फुले यांच्या योगदानाचा उल्लेख करत त्यांनी मुलींच्या ४३% नोंदणीबद्दल समाधान व्यक्त केले. भारताला कौशल्याची राजधानी आणि सुपर पॉवर बनवण्यात शिक्षकांची भूमिका निर्णायक आहे, असे त्यांनी सांगितले.

# भारतामध्ये विश्व नेतृत्व करण्याची क्षमता – पुतीन

**ज्योतिर्मय साहित्य**

शांघाय सहकार्य संघटनेचे २४ वे अधिवेशन उत्तर चीनमधील तियानजिन या बंदरात नुकतेच संपन्न झाले. या परिषदेस जगातील २० देशांचे आणि दहा संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या परिषदेने सबंध जगाचे राजकारण व अर्थकारण ढवळून टाकले आहे. महत्त्वाचे म्हणजे सबंध जगातील



सत्ता समतोलाचे समीकरण या परिषदेने नव्याने मांडले आहे. चीन, रशिया आणि भारत यांच्या त्रिकुटाचा उदय समसमान तेल खरेदीमुळे झाला आहे. रशियाकडून भारत आणि चीन हे दोन्ही देश कच्च्या तेलाची खरेदी करतात. खरे तर अमेरिका सुद्धा चीनकडून कच्चे तेल विकत घेते. परंतु, भारताच्या तेल खरेदीमुळे पोटदुखी होऊन ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के टॅरिफ लादला आणि त्यांच्या विरोधात युरेशियातील या तीन सत्ता एकत्र आल्या. त्यांनी या परिषदेत जगापुढे आपला बुलंद आवाज प्रकट केला आहे. या परिषदेतील विचार मंथन आणि फलश्रुतीचा विचार करता असे दिसते की, या परिषदेने भारत आणि चीन यांच्यातील मैत्री पुन्हा प्रस्थापित




झाली आहे आणि रशिया आणि भारत यांच्यातील ऐतिहासिक मैत्रीला नवे संदर्भ प्राप्त झाले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रशियाचे अध्यक्ष ब्लादिमोर पुतीन यांनी त्यांच्या कारमध्ये केलेली गोपनीय चर्चा ही अमेरिकेच्या दबावाच्या राजकारणाला निश्चितपणे ठोस उत्तर म्हणून महत्त्वाची ठरली आहे.

मोदी यांचा बुलंद आवाज

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एसीओ परिषदेत दहशतवादाच्या प्रश्नावर दुटप्पी भूमिका घेऊ नये अशी भूमिका घेणे ही गोष्ट लोकशाहीच्या दृष्टीने योग्य नाही, असे ठणकावून सांगितले आणि त्यांनी हा इशारा चीन आणि पाकिस्तान या दोघांनाही दिला आहे तसेच त्यांनी रशियाचे अध्यक्ष पुतीन यांच्याबरोबर केलेल्या विचार मंथनातून त्यांच्या टॅरिफ धोरणालाही चांगलेच चेपले आहे. अमेरिकेने बहुध्रुवीय जगात न्याय आणि संतुलन साधले नाही तर काय घडू शकते याचा प्रत्यय या परिषदेच्या रूपाने आला आणि भारत रशिया आणि चीन यांचे त्रिकूट आता बलशाली झाले आहे. भारत आणि चीन या दोघांची मिळून लोकसंख्या २.८ कोटी एवढी असून, दोघांचा मिळून सबंध जगात सर्वात मोठा विकास वेग आहे. त्यामुळे हे २१ वे शतक आशियाचे शतक आहे आणि जगाच्या सत्ता समतोलात आशियाच्या अभ्युदयाला आता प्रारंभ झाला आहे. याची साक्ष या परिषदेने दिली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अष्टपैलू नेतृत्वाचा विचार करता असे दिसते की, त्यांनी आपले कर्तुत्व, वक्तृत्व आणि दातृत्व या तिन्ही गोष्टींचा विचार करता विश्वगुरू म्हणून जगाच्या राजकारणावर जबरदस्त ठसा उमटविण्यास प्रारंभ केला आहे. पंडित जवाहरलाल नेहरू यांचे पंचशील तत्व पुन्हा नव्याने प्रत्ययास आहे काय या प्रश्नाचे उत्तर असे की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आता केवळ पंचशीलच नव्हे तर कौटिल्याचे सप्तांग राज्यसूत्र जबरदस्तपणे गतिमान केले आहे. शांततामय सहजीवन, सहअस्तित्व हा तर पंचशीलचा आत्मा आहे. परंतु, त्याही पलीकडे जाऊन कौटिल्याच्या अर्थशास्त्रात असे म्हटले आहे की, स्वामी, दुर्ग, कोशदंड हे राज्याचे सात घटक जर बलशाली असतील तर कुठलेही राज्य जगावर प्रभुत्व गाजवू शकते.१९६२ आणि २०२५ चा भारत यात महद्अंतर आहे. भारताने आज संरक्षण उत्पादन क्षेत्रात सर्व जगाला मागे टाकले आहे. भारताने विकसित केलेली ब्रह्मो, तेजस तसेच लढाऊ युद्धनौका यांचा विचार करता आज जगामध्ये सर्वात प्रगत संरक्षण उत्पादने कोणाची असतील तर ती भारताची आहेत, हे आता जगाने लक्षात घेतले आहे आणि त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अष्टपैलू नेतृत्वाचा प्रभाव सबंध जगावर दिसून येत आहे, हे या परिषदेचे एक महत्त्वाचे फलित होय.

स्थैर्याचा खरा आधार

भारत आणि रशिया संबंध हे स्थैर्याचा एक मूलभूत आधार आहेत. केवळ आशियाच्या सत्ता समतोलात नव्हे, तर सबंध जगाच्या राजकीय व आर्थिक समतोलात भारत आणि रशिया मैत्री ही अत्यंत महत्त्वाची आहे. गेल्या ७५ वर्षात दुसऱ्या महायुद्धापासून आजपर्यंत अखंडपणे भारताची रशियाबरोबरची मैत्री स्थिर आहे, भक्कम आहे आणि प्रगतिपथावर आहे आणि या मैत्रीमुळेच भारताला आता जगामध्ये प्रभुत्व गाजविण्याची संधी लाभत आहे. पुतीन म्हणतात त्याप्रमाणे भारतामध्ये विश्व नेतृत्व करण्याची क्षमता आहे, पात्रता आहे आणि हे नेतृत्व सिद्ध करण्यासाठी भारत आता पुढे सरसावला आहे. त्याची बाजू घेणे हे रशियाचे कर्तव्य आहे. त्यामुळे पंतप्रधान मोदी आणि पुतीन यांच्या रशियामध्ये झालेली चर्चा बलशाली राष्ट्रांच्या अभ्युदयाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे.

भारत –रशिया मैत्रीचे आणखी एक सूत्र असे आहे की, सबंध जगामध्ये ज्या –ज्या वेळी अस्थिरता निर्माण होते, मग ती आर्थिक असो, राजकीय असो, की अन्य प्रकारची असो, त्यावेळी भारत आणि रशिया दोघांनीही शांतता, स्थैर्य व समतोलाच्या दृष्टीने यथार्थ भूमिका घेतल्या आहेत. त्यामुळे अमेरिकेच्या एकांगी, एककल्ली धोरणांना प्रतिशह देण्यात दोन्ही राष्ट्रे यशस्वी ठरली आहेत. त्यामुळे आता टॅरिफच्या प्रश्नांवर डोनाल्ड ट्रम्प यांनी घेतलेली एककल्ली भूमिका पाहता भारत आणि रशिया यांच्या परस्पर सहकार्यामुळे या भूमिकेला निश्चितच प्रतिष्ठा मिळेल आणि त्यामुळे जगात आर्थिक स्थैर्य व आर्थिक संतुलन निर्माण होऊ शकेल. या शिखर परिषदेनंतर ट्रम्प जगामध्ये एकाकी पडत आहेत. राजकीय संतुलनाबरोबरच आर्थिक संतुलन सुद्धा तेवढेच महत्त्वाचे आहे, हे लक्षात घेऊन आपणास तेल खरेदीचे महत्व अधोरेखित करता येते. जगातील नामांकित वृत्तसंस्था असे म्हणतात की रशिया, चीन आणि भारत यांना जवळ आणले आहे ते कच्च्या तेलामुळे. रशियाकडे असलेला अमाप कच्च्या तेलाचा साठा हा त्याने इतर देशांसाठी खुला केला आणि भारताने जेव्हा कच्च्या तेलाची खरेदी केली, तेव्हा खुद्द प्रेसिडेंट जो बायडेन यांनी जगाच्या आर्थिक समतोलासाठी भारताने अशी खरेदी करणे आवश्यक आहे, असे म्हटले. त्यामुळे तेव्हापासून आतापर्यंत जगातील तेलाचा दर २०० डॉलर्स प्रतिबॅरल कमी झाला आहे, हे भारताचे योगदान ट्रम्प कसे विसरतात, हा खरा प्रश्न पडतो. खुद्द अमेरिकेत ट्रम्प यांच्या विरोधात अपील न्यायालयाने दिलेला निर्णय पाहता टॅरिफ कसे बेकायदेशीर आहेत, याचा डंका आता जगभर वाजला आहे आणि त्यात भारत –रशिया मैत्रीमुळे ट्रम्प यांचे पितळ चांगलेच उघडे पडले आहे, असे म्हणावे लागेल. **(क्रमशः)**

## वास्तुशास्त्र पेंटिंग

लघुलेख -३७



वाचकहो...

नक्षत्रे, आपल्या आकाशातील स्थानांपासून किंचितही हालत नाहीत अशा प्रकारचे अगणित तारे, आकाशात स्थिर आहेत, आपल्या जागेवरून ढळत नाहीत. या स्थिर ताऱ्यांमधील कांही तारे वा तारका समूहांना 'नक्षत्रे' या नावाने संबोधले जाते. ही नक्षत्रे, चंद्र सूर्य इत्यादींचा जो वर्तुळाकृती भ्रमणमार्ग दिसतो, त्यातच स्थिरावलेली असतात या तारक समूहाच्या संख्या आणि आकारांवरून त्यांना नावे दिलेली आहेत. त्या नक्षत्र तारका समूहातील 'संख्ये' चा आपण आपल्या पेंटींग मध्ये अत्यंत गोपनीयतेने अवलंब करतो.

प्रत्येक नक्षत्रांच्या देवता कल्याणकारी, शुभ आणि बलवान आहेत. प्रत्येकाने जर स्वतःच्या नक्षत्रदेवतेची प्रार्थना-पूजा करण्यास प्रारंभ केला तर अत्यल्प काळात त्याला त्याचा लाभ व्हायला सुरुवात होते फक्त एक गोष्ट आपण ध्यानात घ्यायला हवी की, मंत्र जप करतांना शब्दोच्चारण फार काळजीपूर्वक करावयास हवेत. मंत्र पाठ म्हणजे आत्मसात नसेल तर समोर लिहून वाचावा, उच्चार जमत नसेल तर तज्ञा कडून समजून घ्यावा, त्या मंत्राचा अर्थ समजून घेवून मगच त्याचं पठण करावं...साध्या वेलांटीचा उच्चार चुकला तरी अनर्थ होण्याची शक्यता असते. जसे 'इंद्रजित्' याचा अर्थ 'इंद्रास जिंकणारा' तर "इंद्रजीत" या शब्दाचा अर्थ 'इंद्राकडून जिंकला गेलेला'....!!!

'अहिल्या नगर' ला एक महाराज आहेत; ते त्यांच्या भक्तांकडून वेगवेगळे जप करवून घेतात. उच्चार म्हणाल तर शहाण्याला, तज्ञाला चक्कर येण्याची वेळ येईल. यामुळे होतं काय की, एका विशिष्ट वेळी दुष्परीणामांना सुरुवात होते. शरीरात सुरु झालेला आजार पुर्ण पक्का-स्थीर झाला की मग आपल्या लक्षात येतो. तोपर्यंत वेळ निघून गेलेली असते. अशावेळी हे उच्चार, मंत्र जप इ. जर आपण व्यवस्थित करू शकत नाही ना....!! अशा वेळी वरील सर्व घटकांनी युक्त "वास्तुशास्त्र पेंटिंग" कडे नुसतं पाहण्यानेही बरंच कांही साध्य करता येते. कारण आपली दृष्टी चुकीचं पहात नाही ना...!!

क्रमशः.....

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान

डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238




## जात्यावरच्या ओव्या......

लेकीचं लगन
मांडव इथुन - तिथून
सरबताचे रांजण
आमराईच्या खेटून॥२४७॥

लेकीचं लगन
बस्ता जरी - पागोट्याचा,
रेशमी पैठण्या
मोरपंखी येवल्याच्या ॥२४८॥

संदर्भ - शांताई इंगळे
संकलन - सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

## शब्द खेळांचे सांगती अर्थ आयुष्याचा...!




ज्योतिर्मय साहित्य

१९८३ च्या वर्ल्ड कपमध्ये कोणी भारताला गांभीर्याने घेत नव्हतं. पण कपिल देवने परिस्थिती समजून घेत, आत्मविश्वास आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवत इतिहास घडवला. त्याचं धैर्य आणि मनोबल हे आपल्याला शिकवतं की संघर्षाच्या क्षणी डोकं शांत ठेवणं म्हणजे पराभव स्वीकारणं नव्हे ते यशाची पूर्वतयारी असते. कपिल देव आपल्याला सांगतात ''पॉसिटीव्ह थिंकिंग इज नॉट एक्सपेकटिंग द बेस्ट टू हॅपन एव्हरी टाइम, बट ऍक्सेपटिंग डॅट व्हाटेवर हॅपन्स इज फॉर द बेस्ट.'' प्रत्येक वेळी आपल्याला अपेक्षित असेच घडेल असं नाही. पण आपले ध्येय साध्य करण्यासाठी जे काही घडेल त्याचा स्वीकार करून आपल्याला पुढे जायचे असते.



तंत्रशुद्ध खेळणे, आत्मनियंत्रण आणि धैर्य किंवा संयम या गुणांसाठी ज्यांचा गौरव केला जातो, अशा गावस्कर यांनी फास्ट बॉलर्ससमोरही तंत्र आणि संयम यांच्या आधारावर फलंदाजी केली. परिस्थिती कितीही कठीण असली, तरी डोकं शांत ठेवून प्रत्येक चेंडूला सामोरं जाणं हेच त्यांचं वैशिष्ट्य होतं. ते म्हणतात, ''टू बी सकसेसफूल, यु नीड टू बी ऍट पीस विथ यौरसेल्फ.''

सुनील गावस्कर यांनी गायिलेलं
''या दुनियेमध्ये थांबायला वेळ कोणाला ?
हे जीवन म्हणजे क्रिकेट राजा हुकला तो संपला...'' हे गाणं प्रसिद्ध आहे. जीवनाच्या मैदानावर फलंदाजी करत असताना समोरून संकटाची भेदक गोलंदाजी तुमच्यावर मारा करत असते .अशावेळी सावध राहायचे असते कोणतीही संधी हुकू द्यायची नसते. जो हुकला, तो संपला. चातुर्याने आपली खेळी करायची असते असाच संदेश गावस्कर या गीतातून आपल्याला देतात.

तर ज्याला क्रिकेटचा देव म्हटले जाते अशा सचिन तेंडुलकरचे खेळासंबंधीचे विचार अत्यंत मननीय आहेत. तो म्हणतो...

''माझ्यासाठी, क्रिकेट हा फक्त खेळ नाही, तर ती माझी पूजा आहे.''

''प्रत्येक खेळाडूने आपल्या देशासाठी आणि आपल्यासाठी सर्वोत्तम देण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे.'' ''अपयश आले तरी खचून न जाता, त्यातून शिकून पुढे जायला पाहिजे.'' ''कठोर परिश्रम आणि समर्पण यांमुळे यश निश्चित मिळते.''

''तुम्ही जे काही करता, त्यात १००% द्या.'' (क्रमशः)






उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## शुध्दज्ञान निरूपण

ज्योतिर्मय साहित्य


भाषा आहे. वेदांच्या पेक्षा श्रेष्ठ काहीच नाही. कारण वेदांचे सारें रहस्य वेदांतामध्ये प्रगट झालेले आहे.

अशा वेदांताच्या जो तात्पर्यार्थ आहे आणि जो अत्यंत खोल परमार्थ आहे . अतिशय खोल आणि अर्थगंभीर असे जर काही असेल तर तेसद्गुरूंचे वचन होय. त्यावचनाने निश्चित पणे समाधान मिळते. सद्गुरूचे वचन तोच खरा वेदांन्त तोच खरा सिध्दांत होय. ते खरे अनुभवलेले ज्ञान होय. सद्गुरूच्या चरणांशी सतत ''दास''म्हणून राहिले पाहिजे.

स्वतः जर परमात्म स्वरूप आहे आत्मज्ञानाचे सर्वागाने वर्णनं केले. सद्गुरूशी अनन्य होऊन ते ज्ञान प्राप्त होते व पूर्ण समाधान मिळते.

''अहं ब्रम्हास्मि'' हे महावाक्यांमध्ये सर्व समाधान मिळते.यात गुरू व शिष्य एकरूपहोऊन जातात. शिष्या,या महावाक्यातील मर्म समजून घे. तू स्वत: ब्रम्ह आहेस.यात संशय धरू नकोस. समर्थानी भक्तिचे न ऊ प्रकार सागितलेत। आत्मनिवेदन. हा त्यातला मुख्य प्रकार आहे। विश्व निर्माण होते त्यावेळी ही पंचमहाभूत क्रमाक्रमाने निर्माण होतात पण विश्व अशाश्ववत आहे,त कल्पांताच्या वेळी ते नाश पावते. तेव्हापासून ही पंचमहाभूते ज्या क्रमाने निर्माण होतात,त्याच क्रमाने लय पावतात.

येवढेच नाही तर अखेर उरणारी दोघे. प्रकृती आणि पुरूष ती देखील परब्रम्हात विलीन होतात. जर सर्व द्रुष्यवस्तु नाश पावल्या म्हणजे मी पणाने वावरणारा मी देखील उरत नाही. कारण मुळांतच परमात्मा एकरूप असल्याने दुसरे काही कर्ुा लागत नाही.



## नामात राहणे म्हणजे मरणातीत होणे.

श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

मुलगा आजारी पडला तर माणूस देवाला नवस करून त्याला जगवायचा प्रयत्न करू लागतो; 'जगला तर देवाला अर्पण करीन' म्हणतो. अर्पण करणार म्हणजे आपलेपणा सोडणार; मग तो आज मरण पावला तरी कुठे बिघडले ? मुलगा जगावा असे वाटते ते आमच्या सुखाकरिताच. एक दिवस हा जाणारच हे ज्याला खरे पटले, तो नाही देवाजवळ असे मागणार. जन्ममरणाच्या फ ेऱ्यातून सुटावे हे मागून घेण्यापेक्षा, मरण चुकवावे हे म्हणणे किती वाईट आहे ! खरा भक्त तोच, की ज्याला संताजवळ किंवा देवाजवळ काय मागावे हे बरोबर समजते. मरणाला जे कारण झाले ते चुकवावे. मरण येणार हे नक्की ठरलेलेच आहे; मग ते चांगले यावे असे नाही का वाटू ? ज्यानंतर पुन्हा जन्म नाही ते चांगले मरण. जो मरतो त्याचा आपण शोक करतो, 'देव आज लोपला' असे म्हणतो, ते आपल्या स्वार्थापोटीच. स्वत:ला विसरणे, 'मी कोण' हे न जाणणे, हे मेल्याप्रमाणेच आहे. याकरिता, आलेली संधी वाया जाऊ देऊ नये. बुद्धी जोवर स्थिर आहे तोवर कार्य साधून घ्यावे. आजची बुद्धी उद्याला टिकत नाही असे आपले चालले आहे. संकल्पविकल्पांनी आपण बेजार होतो. तेव्हा, ज्या वासनेत आपला जन्म होतो ती वासनाच भगवंताच्या नामाने मारून टाकावी. नामात राहणे म्हणजेच वासना मारणे, म्हणजेच मरणातीत होणे. भगवंताचे होऊन राहणे हाच मरण टाळण्याचा खरा उपाय आहे. काळाचाही जो काळ, त्याला ओळखल्यावर मरणाची भीती कसली ! ज्ञानी नाही मरणाची काळजी करीत. नुसते जिवंत राहणे हे काही खरे नव्हे. जगणे हे काहीतरी हेतूसाठी, ध्येयासाठी असावे. जगून भगवंताच्या अनुसंधानात राहावे. भाग्याचा दिवस तोच, की ज्या दिवशी नामस्मरणामध्ये देहाचा अंत झाला.

वास्तविक, आम्ही दररोज जगतो आणि मरतो. एकदा निजला आणि पुन्हा जागा नाही झाला की तेच मरण ! झोप हे एक प्रकारचे मरणच आहे. एवढ्याकरिता, झोपी जाताना नामस्मरण करीत करीत झोपी जावे, म्हणजे उठतानाही नामस्मरणातच जाग येईल. पण झोपेच्या वेळी नाम येण्यासाठी, त्याचा अगोदर अभ्यास करणे जरूर आहे. जागृतीत अभ्यास केला नाही, तर झोपेच्या वेळी दुसरेच विचार येतील. नामस्मरण बाजूलाच राहील, आणि भलत्याच विचारात पटकन झोप लागून जाईल. सदोदित नामस्मरण केले नाही तर ते अंतकाळी कसे येईल ? अभ्यास अगोदर केला नाही तर परीक्षेच्या वेळी तो कसा येईल ? तेव्हा नामस्मरणाच्या अभ्यासाला आजपासूनच सुरुवात करू या.

'आपुले मरण पाहीले म्या डोळा' म्हणजे माझ्या देखत वासना संपूर्ण क्षीण झाली हा अनुभव येणे.

***

## ॥ संत महात्म्य ॥

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

### जगद्गुरु संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांचा अभंग

ज्योतिर्मय साहित्य

ज्यावेळेस ज्ञान प्राप्त झाल्यानंतर सविकल्प समाधीचा अभ्यास सुरू होतो. तो दृढ झाल्यावर निर्वीकल्प समाधीचा अभ्यास सुरू होतो. या अभ्यासा दरम्यान शून्या वस्थेचा अनुभव येतो. जाणीव तर आहे पण अवतीभवती काहीही नाही. केवळ अंधकार आहे, ही स्थिती येते. त्यावेळेस गुरु साधकाच्या मदतीसाठी साधकाच्या हृदयात अनाहत नाद प्रकट करतात. या अनाहत नादाला तुकाराम महाराज महावाक्ये कानी बोंब झाली असे म्हणतात.

माणुस स्वाभाविकपणे विषय वस्तू व व्यक्ती याविषयी आत्मीयता बाळगून असतो. विषयाकडे वळलेले मन व बुद्धी हे माणसाला कर्म बंधनात अडकवीत असते. हा घट विरुद्ध दिशेने फिरवणे म्हणजे प्राण मन बुद्धी आत्म्याकडे वळवणे हे काम मी केले, म्हणून फिरविला घट आणि अहंकाराचा मटका मी चरणावर फोडला म्हणजेच अहंकार लिन केला असे महाराज म्हणतात.

*दिली तिळांजली कुळ नाम रूपाशी/ शरीर ज्याचे त्यासी समर्पिले/ तुका म्हणे रक्षा झाली आपोआप उजळला दीप गुरुकृपे//*

जेव्हा अहंकार लीन होतो. मन हे मृतप्राय होते. मी तू पणाची जाणीव संपते. मग कूळ, नाव, रूप, पद, भौतिक ऐश्वर्य, देहाचे सौंदर्य, इत्यादी गोष्टी कुठून असणार? ही स्थिती येण्याआधी पंच तत्वाची उपासना करावी लागते.

आपला देह हा पृथ्वी,जल आप वायू तेज या पंच तत्वांनी बनलेला असतो. या साधनेत या पंच तत्वाची आटणी करणे आवश्यक असते. सडणारे, कुजणारे, जरा, वृद्धत्व येणारे देहाचे परमाणु याला माइक परमाणु असेही म्हणतात. ते संपवून त्या ऐवजी अमाईक परमाणु बनवावे लागतात. या स्थितीला ज्ञानेश्वर महाराज देह होय सोनियाचा असे वर्णन करतात. या पंच तत्वाची आटणी करून शरीरातील ती ती तत्वे त्या त्या तत्त्वात विसर्जित केली म्हणून माइक परमाणु जळून त्याची राख झाली असे महाराज म्हणतात. आणि आत्म ज्ञानाचा दीप सद्गुरूच्या कृपेने उजळल्या गेला असे असे तुकाराम महाराज सांगतात.

बरेच लोक या स्थितीच्या अर्थ ,त्यांना पेलवेल या पद्धतीने सांगतात. त्यामुळे अशा सिद्ध पुरुषांचा, त्यांनी केलेल्या कठोर साधनेचा, आणि त्यांना प्राप्त झालेल्या दुर्मिळ उच्च स्थितीचा उपमर्द केल्याप्रमाणे होते. व तसेच तार्किक दृष्टीने व व्यावहारिक दृष्टिने पेलणारे अर्थ सर्वत्र प्रसृत झाल्यामुळे, मूळ अर्थ लोपल्या जातात.(अर्थे लोपली पुराणे, नाश केला शब्द ज्ञाने/विषय लोभी मने/साधने बुडविली) खरी साधना काय असते हे कोणासही माहिती सुद्धा होत नाही.

या स्थितीचा पूर्णत्वाने मला अनुभव नसला तरी माझ्या पाहण्यात असे अनुभव घेणारे साधक आलेले आहेत. त्यामुळे या स्थितीचा उल्लेख निसंधीग्ध पणे मी येथे केला आहे.

सर्वश्रेष्ठ संतांनी या कठोर साधना केल्या त्यामुळेच त्यांना हे उच्च पद प्राप्त झाले. आपणही त्याप्रमाणे सद्गुरूची कृपा असेल व कठोर साधना केली तर आपणही त्या स्थिती पर्यंत कदाचित जाऊ शकतो.

आपण या साधनेचा मार्ग अवलंबावा हाच कदाचीत हे अनुभव सांगण्या मागचा संतांचा मानस असेल ! जगद्गुरु तुकाराम महाराजांच्या चरणावर कोटी कोटी वंदन करून हा भाग इथे संपवू यात.

***

## ॥ निरूपण ॥



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**नाथः स सकलानां च विनाथानां विशेषतः।**
**जनास्तस्य महाकृपां लब्ध्वाऽनन्दीभवन्ति हि।।२१।।**

ते सर्वांचे नाथ आहेत. अनाथांचे विशेष नाथ आहेत. लोक त्याची महती कृपा प्राप्त करून आनंदी होतात.

**नीलकण्ठो महारुद्रः शं करोतीति शङ्करः।**
**हिमाद्रितनयाकान्तो विश्वनाथो जगत्पिता।।२२।।**

नीलकंठ, महारुद्र, सर्वांचे कल्याण करणारे पार्वतीपती शङ्करजी विश्वनाथ व जगत्पिता आहेत.

**नन्दिध्वजो विभूतीशो भुजङ्गपरिवेष्टितः।**
**रजनीशप्रियः श्वेतः शिवो मे पातु सत्वरम्।।२३।।**

नंदी वाहन असणारे, विभूतीश्वर, सर्पपरिवेष्टित, ज्यांना चंद्र प्रिय आहे व गौरांग अशाशिवजींनी माझे सत्वर रक्षण करावे.

**भागीरथीतटे वासो भक्तजनमनस्स्वपि।**
**पार्वतीपरमेशो मां हासं पातु सदा सदा।।२४।।**

भागीरथीच्या तीरावर तसेच भक्तजनांच्या मनांत निवास असणाऱ्या पार्वतीपरमेश्वराने माझे चंद्रहासाचे सदा सदा रक्षण करावे.




## बेलफळांचा वापर आयुर्वेदिक औषधांमध्ये भरपूर केला जातो.

ज्योतिर्मय साहित्य

तसेच या झाडाची पाने, फुले, झाडाची साल व खोडाचा गाभा याचाही आयुर्वेदिक औषधी म्हणून उपयोग करता येतो. बेलाचे झाड हे वातावरण शुद्धीकरणाचे कार्य करते.

बेलाची पाने रक्तातील साखर नियंत्रित करण्यासाठी उपयुक्त मानली जातात. यामध्ये रेचक गुणधर्म मोठ्या प्रमाणात आढळतात. जे पुरेसे इन्सुलिन तयार करण्यात मदत करतात. त्यामुळे रक्तातील साखर नियंत्रित राहते. आयुर्वेदाचार्यांशी सल्लामसलत केल्यानंतर ते सेवन केले जाऊ शकते.

पोट साफ होते

बद्धकोष्ठतेची समस्या असल्यास वेलाची पाने खावीत. बेलची पाने थोडे मीठ आणि मिरपूड चघळल्याने बद्धकोष्ठतेपासून आराम मिळतो. ही पाने आतड्यांमधून विषारी पदार्थ काढून टाकण्यास मदत करतात, असेही म्हटंले जाते.

पचनक्रिया चांगली राहते

बेल पोट साफ करण्याचे काम करते. यात रेचक गुणधर्म आहेत जे पाचन तंत्र मजबूत करतात. तुम्हाला पचनाच्या समस्या असतील तर बेल किंवा बेलची पाने खाऊ शकता. परंतु ती प्रमाणात खाणे गरजेतचे आहे.

मधुमेहाच्या रुग्णांसाठी

बेल अतिशय फायदेशीर आहे. दिवसातून दोन वेळा बेलाच्या पानांचा रस पिल्यास मधुमेहापासून मुक्तता मिळविणे शक्य होऊ शकते. शरीराच्या वजनानुसार बेल फळाचा अर्क घेतल्यास त्याचा परिणाम दिसून येतो. कारण कौमारीन नावाचा घटक बेल फळामध्ये असल्यामुळे इन्सुलिन निर्माण करण्यासाठी बीटा पेशीला उत्तेजित करतो.

अतिसार विरोधी

उन्हाळ्याच्या दिवसात अतिसार ही समस्या आता अधिकांश लोकांमध्ये दिसून येते. अलीकडे या रुग्णांचे प्रमाण वाढीस लागले आहेत. या परिस्थितीत उलट्या, हगवण, मळमळ वाटू लागते. बेलाच्या पाण्यात साखर मिसळून प्यायल्यास याचे लाभ दिसून येतात. किंवा कच्चे फळे खाल्यास अतिसार नियंत्रणामध्ये येतो. अर्धे पिकलेली फळ हे सर्वोत्तम मानले जाते परंतु संपूर्ण पिकलेली फळे किंवा अगदी फळाचा चूर्ण परिणामकारक परिणाम दर्शवितो.

रक्तक्षयविरोधी

बदलत्या जीवनशैलीत अनेकांना रक्ताच्या कमरतेचे लक्षण दिसून येतात. अशा परिस्थितीत वाळलेल्या बेलाच्या गराचा चूर्ण तयार करा. तो चुर्ण गरम दुधात रोज एक चमचा टाका आणि प्या. यामळे शरीरात नवीन रक्त तयार होण्यास सुरुवात होते.

ऊन लागल्यास

जागतीक तापमानवाढीमुळे दरवर्षी उन्हाळ्यात तापमानचा पार वाढतो. दरवर्षीचा हा अनुभव असल्याने अनेकांना ऊन लागते. हा त्रास सुरू झाल्यास बेलाच्या ताज्या पानांना कुटून मेहंदीप्रमाणे तळपायावर लावावे. अशा वेळी बेलाचा शरबत प्यायल्यास तत्काळ आराम मिळतो.

बेल फळाच्या लगद्यामध्ये स्टिरॉइड्स, कूमारिन्स, फ्लॅनोनोयड्स, टेरपेनॉईड, फिनोलॉलिक संयुगे, लिग्निन, इनुलीन, आणि अन्य एंटिऑक्सिडेंट जी आपल्याला जुनाट रोगांपासून वाचवू शकतात. याव्यतिरिक्त, त्यात प्रथिने, कर्बोदके, खनिजे (कॅल्शियम, फॉस्फरस, पोटॅशियम, लोह) आणि जीवनसत्वे (विट ए, विट बी, विट सी आणि रिबोफॅव्हिन) यांचा समावेश आहे. ॲल्कॉइड, कार्डियाक ग्लायकोसाइड आणि फ्लॅनोनोयड्स इत्यादीचा उत्तम स्त्रोत आहे. बेलफळ हे स्थानिक पारंपारिक औषधांसाठी वापरले जाणाऱ्या महत्वाच्या झाडांपैकी एक आहे.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९




ज्योतिर्मय साहित्य

कोणाचा दृष्टांत...

विभीषणहाने तुमच्या शिवाय मी कोणास शरण जावे?

भगवान म्हणतात ना मला शरण आला त्याचे रक्षण मी करतो.कारण जगात शरन्य केवळ मी आहे.स्वतःला वेगळे न समजता मला एकरूप होणे हे शरण होय.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

बिभीषण आला.चरणावर मस्तक ठेवले सर्व लोकात तुम्हीच एकमेव शरन्य असेल. मी सर्व सोडून आला.मी लंकेचा परित्याग केला.मी मित्रा सोडले धन सोडले.असा निःसंग होऊन आलो.सर्वांना हे आवडले. रामानी त्यास तुला रावण वधानंतर लंकेच्या गादीवर बसविण्याचे वचन दिले.

लक्ष्मण म्हणे तुम्ही असे वचन लगेच द्यायला नको म्हणे. कारण समाज रावण शरण आला तर तुम्ही त्यास मारू शकणार नाही मग याला गादीवर कसे बसविणार?

राम म्हणाले असे झालेच तर मी अयोध्येचे राज्य बिभीषणास देईल.

पुन्हा एकदा सामोपचाराचा प्रयत्न केला पण उपयोग झाला नाही.

समुद्रांनी ३ दिवस वाट पाहूनही दिली नाही शेवटी धनुष्य वर बाण चढविला की घाबरून सह कुटुंब प्रकट झाला. तुम्ही सत्र काढल्या शिवाय प्रकट झाला नाहीत. समुद्र म्हणे मी तुमचा पूर्वज आहे तुम्ही माझे वंशज आहात पण खरे सांगतो तुमची मला लाज वाटते, तुमचे तोंड पाहण्याची लाज वाटते.


(क्रमशः)

# प्रतिभावान स्वातंत्र्ययोद्धा - दिनेश गुप्ता

**ज्योतिर्मय साहित्य**

बंगाल व्हॉलंटियर्स या जहाल क्रांतीकारक संघटनेने बंगालचे तुरुंग महानिरीक्षक लेफ्टनंट कर्नल एन.एफ. सिंप्सन यांना ठार मारण्याचे ठरविले. जे सिंप्सन तुरूंगातील स्वातंत्र्यलढ्यातील कैद्यांशी गैरवर्तन करण्यासाठी कुप्रसिद्ध होते. क्रांतीकारकांनी कलकत्त्यातील डलहौसी स्क्वेअरमधील सचिवालय इमारतीवर- रायटर्स बिल्डींगवर हल्ला करून केवळ तुरूंग महानिरीक्षक सिंप्सन यांची हत्या करण्याचीच नव्हे तर ब्रिटीश वसाहतवादी वर्तुळात दहशत निर्माण करण्याचा निर्णय घेतला.

८ डिसेंबर १९३० रोजी दिनेश चंद्र गुप्ता, बादल गुप्ता, विनोय कृष्ण बसु हे तीन बंगाली बंगाल व्हॉलंटियर्स या जहाल संघटनेचे तरुण युरोपियन पोशाख परिधान करून रायटर्स बिल्डींगमध्ये घुसले. सिंप्सन यांच्या ऑफिसमध्ये घुसण्यापूर्वी पहारेकऱ्याला त्यांनी क्लोरोफॉर्मने बेशुद्ध केले आणि तुरूंग महानिरीक्षक लेफ्टनंट कर्नल एन.एफ. सिंप्सन यांना त्यांच्याच ऑफिसमध्ये गोळ्या घालून ठार मारले. बंगालच्या अर्थसदस्याच्या खोलीमध्ये गोळ्या झाडून ज्युडिशियल सेक्रेटरी नेल्सन यालाही जखमी केले. या गोळीबारात व्टिनम, प्रेंटिस हे इतर ब्रिटीश अधिकारीही जखमी झाले. तिन्हीही जहाल स्वातंत्र्यमूर्तींचा रुद्रावतार पाहतांच तेथे उपस्थित असलेला अमेरिकन मिशनरी जॉन्सन हा शंखनाद करीत इमारतीच्या मागच्या पाईपवरून उडी टाकून पळून गेला. दिनेश गुप्ता, बादल गुप्ता आणि बिनोय बासु यांच्यावर ब्रिटीश पोलिसांनी त्यांना



पकडण्यासाठी गोळीबार चालू केला. तिन्ही क्रांतीकारकांना आपण रायटर्स बिल्डींगमधून बाहेर सुखरूपपणे बाहेर पडू शकणार नसल्याची कल्पना होती. ब्रिटीश पोलीसांच्यात आणि या क्रांतीकारकांच्यात चालू झालेल्या गोळीबारात लवकरच ब्रिटीश पोलिसांनी या तिघांनाही चारी बाजूने घेरले. तिघेही पोलिसांच्या तावडीत येणार याची त्यांना कल्पना येताच बादल गुप्ता या क्रांतीकारकाने पोटॅशियम सायनाइड घेतले. दिनेश गुप्ता आणि बिनोय बसु यांनी स्वतः च्याच पिस्तुल मधुन स्वतःला गोळ्या मारून घेतल्या. बादल गुप्ता या जहाल क्रांतीकारकाचा तिथेच मृत्यू झाला. दिनेश गुप्ता आणि बिनोय बसू या क्रांतीकारकांना जखमी अवस्थेत हॉस्पिटलला नेण्यात आले.




बिनोय बसू यांचा १३ डिसेबर १९३० रोजी हॉस्पिटलमध्येच मृत्यू झाला. दिनेश चंद्र गुप्ता हे क्रांतीकारक स्वतःवरच मारून घेतलेल्या गोळीबारातून झालेल्या प्राणघातक दुखापतीतून बचावले. त्यांना स्वातंत्र्यलढ्याच्या स्वातंत्र्यसैनिकांना ठेवण्यात येणाऱ्या प्रसिद्ध असलेल्या अलिपूर मध्यवर्ती तुरूंगात ठेवण्यात आले.

अलीपुर तुरूंगात असताना त्यांनी त्यांच्या बहिणीला पत्रे लिहिली. दिनेश गुप्ता यांच्यावर गालिक या न्यायाधीशाच्या कोर्टात केस चालविण्यात आली. या न्यायालयीन प्रक्रियेत त्यांच्यावरील सिंप्सन यांना गोळी मारून ठार मारण्याच्या सहभागाबद्दल तसेच इतरांवर गोळीबार केल्याबद्दल मृत्यूदंडाची शिक्षा सुनावण्यात आली. ७ जुलै १९३१ रोजी अवघ्या १९ व्या वर्षी त्यांना अलीपुर मध्यवर्ती तुरुंगात फाशी देण्यात आले.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील दिनेश गुप्ता, बादल गुप्ता आणि बिनोय बसू यांनी केलेले हे धाडस आणि रोमांचकारी कृत्य याची ऐतिहासिक नोंद असून या कृत्यामुळे हिंदुस्थानातील तरुणांचा स्वातंत्र्यलढ्यातील सहभाग प्रचंड प्रमाणात वाढला. तिघांच्याही हौतात्म्य आणि आत्मत्यागामुळे बंगालमध्ये तसेच भारतात आणखी क्रांतीकारी कारवायांना प्रेरणा मिळाली. स्वातंत्र्यानंतर बेनॉय- बादल-दिनेश या त्रिकुटाच्या नावावरून कलकत्ता येथील डलहौसी चौकाचे नांव बीबीडी बाग ठेवण्यात आले.

**(क्रमशः)**

# माझे सोबती

**ज्योतिर्मय साहित्य**
**(मागील अंकावरून)**

त्यामुळे चक्क तिसऱ्या मजल्यावर रहात असूनही इथे मांजर पुन्हा भेटलच.. अर्थात पाळलेली नव्हेच.. सगळी भटकीच.. पण थोडसं बोलावलं मायेन एकदा पाठीवरून हात फिरवला की ही सगळी जमात वरपर्यंत यायची.. मग सगळ खाणं पीणं सोपस्कार सुरू व्हायचे.. इथे एक मनीमाऊ भेटली.. तिला एकवीस पिल्लं झाली तीन चार वर्षांत..! ती सगळी बाळंतपणं आमच्याच घरात.. आमचे दोन शेजारी आणि आम्ही मिळून ही सगळी उस्तवारी आनंदाने करायचो.. शेजारी तर बारसं पण करायचे पाळण्यात घालून एकेका पिल्लाचं! मजा असायची खरच! नावं पण चकली, इडली, गणपतराव, रामभाऊ काय काय ठेवायचो.. शिवाय एक माऊ प्रचंड रागीट आणि सगळ्यांवर धाक जमवून असायचा म्हणून त्याला आम्ही दाऊद म्हणायचो.

मांजर वर्गाचा प्रचंड अभ्यास झाला आहे! पण ही कुठे कुठे आपोआप गायबही व्हायची तेव्हा प्रचंड हळहळ वाटायची.. रोज त्यांची वाट बघणं व्हायच.. नवीन मेंबर्स भरत जायचे या पोकळीत!

कोथरुडच्या या घरात आमच्या शेजाऱ्यांना एक पोपटाच पिल्लू सापडलं.. ते त्यांना मग पाळावं लागलं. ते आमच्या दोन्ही घरात मिळून लहानाच मोठ झाल.. मग जरा मांजरांना दूर ठेवायला लागलं. नंतर या पोपटाला बघून बाहेरचे पोपट हळूहळू गॅलरीत मग खिडकीत मग घरात प्रवेश कर्ते झाले. बिनधास्त खाऊ मागायला आत यायचे.. नंतर खारी यायला लागल्या.. त्यांचीही खिडकीत ठेवलेल्या रिकाम्या बॉक्स मधे पिल्लं मोठी झाली. अगदी खिडकीलगत मोठं जांभळाच झाड होतं त्यामुळे त्यांना जा ये सोपी व्हायची.

सकाळी झोपेतून उठवायला ही सगळी सेना हजर असायची. प्रत्येकाची खाऊची आणि पाण्याची बशी.. मग ती स्वच्छता! पण इतका जीव लावला सगळ्यांनीच. एक कावळ्याची जोडी पण सकाळी सकाळी लाटलेली ताजी पोळी खायला टपून




वर्षा बेंडिगेरी कुलकर्णी
पुणे, ९७६७५८८९३७

बसायची.. बिस्कीट दिलं की पाण्यात बुडवून खायची! दहीभात दिला की स्वारी जाम खुष व्हायची.. समोर घरट्यात पिल्लांना भरवायची जाऊन ही जोडी! अधुन मधुन

बुलबुल जातीतले अनेक पक्षी यायचे! चिमण्या, साळुंक्या यायच्या! प्रचंड गजबज असायची.

पण आता तिथून बाणेरला एका सोसायटीत मोठा फ्लॅट घेतल्याने ते सगळ सोडून गेले तीन वर्ष इकडे रहातोय.! ते सगळ वैभव सोडून येताना अर्थात अतोनात दुःख झालच.. काय त्या मुक्या जिवांना वाटेल अस पटकन तोडून टाकल्यावर असा विचार आला की अपराधी वाटायच.. पण काही गोष्टींना पर्याय नसतो. मन कठोर करावं लागतं!

त्या छोट्या सोसायटीत क्वचित स्वच्छता झाडलोट नसायची.. इथे सगळ अगदी चकचकीत आरशासारखं.

स्विमिंग पूलपासून जिमपर्यंत सगळं नेटकं सुव्यवस्थित नियोजित!


पण आमच्या तिथल्या सार्वजनिक टेरेसवरची सगळी झाडझुडपं.. हे प्राणी. खिडकीतले पक्षी सगळ मिस करतेय.! दूर दूर झाडावर बसलेले किंवा एखाद मांजर टुणकन उडी मारत पळून जाताना क्वचितच दिसतं.. सिक्युरिटी त्यांनाही हाकलून लावतात! आपल्याला या विश्वात स्थान नाही याची जाणीव त्यांनाही होत असावी.. जवळपास फारसे फिरकत नाहीत पण! माहित नाही कुठल्या वळणावर यांची परत गाठभेट होईल..!

# फुला फुलांची अनेक रूपे

**ज्योतिर्मय साहित्य**

फुल पाहिले की मन कसे प्रसन्न होऊन जाते.. खुलतो आपला चेहरा. उमलत्या पाकळ्यांची कोवळी काया आणि त्यामध्ये डोलणारे परागकण देठाचा नाजूक गर्द हिरवा रंग शोभा वाढवावी असा. कधी मोगरा सुगंधाने मनास मोहवतो, तर कधी काट्यात वेढलेली गुलाबाची कळी... जास्वंदाच्या किती तरी रंगाच्या छटा लाल, गुलाबी, पांढरे, नारंगी ओंजळ उघडून बाप्पाचे दर्शन व्हावे अशा.. पिवळा पांढरा चाफा, सोनेरी सोनचाफा आसमंती सुगंध उधळण्यास उमलतोय जणू.. पारिजात दारी सडा शिंपण करतो.. शुभ्र कळ्या नारंगी देठ मंद सुगंध, स्मित हास्य ओठावर कृष्ण बासरी वाजवत असावा तेव्हा हा प्राजक्त स्वर्गीय वृक्ष धर्तीवर आला असावा असे वाटते. रातराणी रात्रीस खुलणारी नभांगणातील चांदण्या प्रमाणे चमकणारी, निशीगंध नाजूक शुभ्र कांती सुगंधाची खाण. अबोलीला विना सुगंध सुंदर दिसण्याचा मान, सदाफुली ताजीतवानी रोज गाते जीवन गाणी, झेंडू मखमली फुलांचे ताटवे पिवळ्या जर्द रंगाची हिरवाईत शोभून दिसणारी, गुलमोहर बहावा बहरात उन्हात डोळ्यांना गारवा देणारी, बकुळीची नक्षत्र फुले, शेवंतीच्या





प्रतिभामहादेव चौगले
कोल्हापूर


कलाकुसरीच्या डोळ्यात भरणाऱ्या पाकळ्या,आणि लाजाळू चे फिकट गुलाबी फुल रांगोळीचा सुंदर ठिपकाच, शंखांच्या आकाराचे गोकर्ण निळे, पांढरे आणि लक्ष्मीस्वरुप कमळ अनेक पाकळ्यांची साचेबद्ध रचना उमलता ना लक्षवेधी नयनांचे पारणे फ ेडणारी.. अशी अनेक उदाहरणे देता येतील फुले उमलतात, बहरतात कोमजतात, काहींचे परागकण परावर्तित होऊन पुन्हा वृक्षात रुपांतर होते. काही फुले सजावट करण्यासाठी, काही देवाला अर्पण करण्यासाठी काही सुगंधाची उधळण मनात ठेवून जाणारी, काही क्षण विस्मरणीय करणारी, फुलेच ती उमलण्यासाठी जन्म घेतात आणि ठरलेली कामे करून परतीच्या वाटेवर निघतात असेच आयुष्य फुलासारखे निर्मळ लाभले तर उमलण्याचा आनंद ही मोठा हवा. निरनिराळ्या फुलासारखा जगण्यातही असावा गोडवा.









# दवाखाना

## कुष्ठरोग - भाग १

**ज्योतिर्मय साहित्य**


नमस्कार मैत्रांनो !

या भागात आणि पुढील कांही भागांत आपण चर्चा करणार आहोत एका अशा रोगाविषयी, ज्याबद्दल जनसामान्यात वर्षानुवर्षांपासून घृणेची, तिरस्काराची आणि भीतीची भावना अतिशय तीव्रतेने दिसून येते. कुष्ठरोग म्हटले की बहुतेक वेळा विद्रूप चेहऱ्याची आणि हातापायाची बोटे झडून गेलेली अशी भीक मागणारी व्यक्ती डोळ्यासमोर येते. कुष्ठरोग ही निव्वळ वैद्यकीय समस्या नव्हे तर एक गंभीर सामाजिक समस्या आहे.

हा रोग मुळात केव्हा आणि कोठे आढळला, याची नक्की माहिती इतिहासकारांना नाही. कुष्ठरोगाची नोंद भारतीय, इजिप्शियन आणि ग्रीकसारख्या विविध प्राचीन संस्कृतींमध्ये कुष्ठ किंवा लेप्रोस या नावाने आढळते. प्राचीन भारतीय आयुर्वेदात याचा उल्लेख आहे. भारतीय वैद्य सुश्रुत यांच्या लेखात कुष्ठरोगाचे विवेचन आढळते. बायबलमध्ये 'लेप्रसी' हा शब्द आहे, मात्र तो वेगवेगळ्या प्रकारच्या त्वचारोगांसाठी वापरलेला आहे.

'बायबल'काळात कुष्ठरोग हा विद्रूप शरीराचा ओंगळवाणा रोग अशी त्याची ख्याती होती. यूरोपात इ.स.पूर्व काळात कुष्ठरोगाचा प्रवेश झाला असे मानले जाते. काही इतिहासकारांच्या मते, पर्शियाचा राजा झेर्झेक्स याच्या सैन्याने जेव्हा इ.स.पू. चौथ्या शतकात ग्रीसमध्ये शिरकाव केला, तेव्हा त्यांच्यामुळे यूरोपात या रोगाचा प्रसार झाला असावा, तर काहींच्या मते अलेक्झांडरच्या सैन्याद्वारे कुष्ठरोगाचा प्रसार युरोपमध्ये झाला असावा असे मानतात. मध्ययुगात कुष्ठरोग युरोप आणि आशियामध्ये मोठ्या प्रमाणावर पसरला होता.

इ. स. अकराव्या आणि बाराव्या शतकांमध्ये पश्चिम यूरोपात कुष्ठरोगाच्या साथी आल्या. लोकांचे जीवनमान आणि आहार यांत सुधारणा झाल्यामुळे यूरोपमध्ये या रोगाचे प्रमाण कमी झाले. मात्र अठराव्या शतकापर्यंत नॉर्वेमध्ये हा रोग अस्तित्वात होता. या नोंदींबरोबरच हे महत्वाचे आहे की या काळात कुष्ठरोगाचे रुग्ण समाजापासून वेगळे ठेवले जात. त्यांच्यासाठी वेगळ्या वस्त्या असत. कुठे कुठे तर कुष्ठरोग्यांसाठी एखाद्या निर्जन बेटाची निवड केल्या जात असे. जिवंत असूनही चर्चद्वारे त्यांचे अस्तित्वच संपवल्या गेल्याचे दाखले आहेत. हा रोग देव / देवीचा प्रकोप असल्यामुळे होतो असा सर्वदूर गैरसमज संपूर्ण जगात पसरला होता. मध्ययुगात कुष्ठरोगावर वैद्यकीय उपचार करण्यासाठी नैसर्गिक आणि पारंपरिक पद्धतींचा अवलंब केला जात होता. मंडळी, आज कुष्ठरोग्यांची शारीरिक अवस्था इतकी दारुण नसली तरी दुर्दैवाने त्यांना समाजातून निष्कासित करण्याची प्रवृत्ती मात्र बऱ्याच अंशी टिकून आहे.





लेखिका
डॉक्टर मीना श्रीवास्तव

कुष्ठरोगाचा आधुनिक इतिहास खूपच आशादायक आहे. नॉर्वे येथील गेरहार्ड हेन्रिक आर्माउर हॅन्सन या चिकित्सकाने १८७३ साली कुष्ठरोगाला कारणीभूत असलेल्या जिवाणूचा शोध लावला. हॅन्सन यांनी कुष्ठरोग्याच्या ऊतींच्या (टिश्यू) नमुन्यात कुष्ठरोगाचे जिवाणू असल्याचे सिद्ध केले. त्यांचे नामकरण मायकोबॅक्टेरियम लेप्रे (हॅन्सन बॅसिलस) असे करण्यात आले. या शोधकार्यामुळे कुष्ठरोग हा जिवाणूप्रणित संसर्गजन्य रोग आहे आणि योग्य प्रतिजैविकांद्वारे त्याचे संपूर्णरित्या निर्मूलन शक्य आहे हा मौलिक विचार पुढे आला. म्हणूनच हॅन्सन यांच्या सन्मानार्थ या आजाराला ''हॅन्सन रोग'' म्हणूनही संबोधले जाते. हे जिवाणू क्षयरोगाच्या जिवाणूंचे आळशी मामे/ मावस/ चुलत/ आत्ये बंधू मायकोबॅक्टेरिएसी कुलातील असून दंडाकार असतात.

संक्रमित व्यक्ती बोलल्यावर, खोकल्यावर किंवा शिंकल्यावर श्वसनाद्वारे बाहेर पडणाऱ्या हवेतील थेंबांद्वारे प्रामुख्याने कुष्ठरोग पसरतो. मात्र हे लक्षात घेणे गरजेचे आहे की याकरता उपचार न केलेल्या कुष्ठरोग्याशी दीर्घकाळ आणि जवळचा संपर्क अत्यावश्यक आहे. म्हणूनच कुष्ठरोग्यांच्या कुटुंबातील सदस्यांमध्ये हा आजार होण्याचे प्रमाण अधिक असते. हा रोग अतिजलद संसर्गजन्य नसून हस्तांदोलन किंवा मिठी मारणे यासारख्या अनौपचारिक संपर्कातून अजिबात पसरत नाही. ही बाब अत्यंत दिलासादायक आहे. कुष्ठरोगाचा उद्भावन कालावधी, म्हणजेच संसर्ग होण्यापासून लक्षणे दिसण्यापर्यंतचा कालावधी (इनक्युबेशन पिरेड) अनेक वर्षे किंवा दशके देखील असू शकतो. यामुळे हा संसर्ग नेमका कुठून झाला हे रोग्यास देखील कळत नाही. हा रोग जनुकीय नाही, परंतु अनुवांशिक कौटुंबिक इतिहास जास्त धोकादायक असू शकतो. माझ्या मते इथे देखील कुटुंबातील व्यक्तींचा दीर्घकाळ संपर्क यासाठी कारणीभूत असावा.

पुढील कांही भागात याच रोगाविषयी चर्चा करू या!



## राजे उमाजी नाईक यांच्या जयंती निमित्त मंत्रालयात अभिवादन

**ज्योतिर्मय साहित्य**

**मुंबई** – राजे उमाजी नाईक यांच्या जयंती निमित्त कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी मंत्रालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव मनिषा वर्मा, उपसचिव दिलीप देशपांडे, सहायक कक्ष अधिकारी राजेंद्र बच्छाव यांच्यासह उपस्थित अधिकारी कर्मचारी यांनीही राजे उमाजी नाईक यांच्या प्रतिमेला पुष्प वाहून अभिवादन केले.

## उद्धव भयवाळ यांना विश्व हिंदी रत्न मानद उपाधी सन्मान

**ज्योतिर्मय साहित्य**




**छ. संभाजीनगर** – १४ सप्टेंबरच्या हिंदी दिनानिमित्त नेपाळमधील शब्द प्रतिभा बहुक्षेत्रीय सन्मान फाउंडेशन द्वारे आयोजित जागतिक हिंदी कविता स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर येथील ज्येष्ठ साहित्यिक उद्धव भयवाळ यांना ''विश्व हिंदी रत्न मानद उपाधी सन्मान'' देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.


या स्पर्धेत नेपाळ, भारत, अमेरिका, आफ्रिका येथील ६८४५ लेखक सहभागी झाले होते. यात भारतातील वीस राज्यांमधून कवी/कवयित्री सहभागी झाल्या आहेत.

यामध्ये कवितेच्या उत्कृष्टतेच्या आधारे दोनशे पन्नास लेखकांची निवड करण्यात आली आहे, त्यापैकी १२८ महिला आणि १२२ पुरुष आहेत. निवडलेल्या सर्व कवींना १४ सप्टेंबर रोजी हिंदी दिनानिमित्त प्रमाणपत्र देऊन तसेच विश्व हिंदी रत्न सन्मान देऊन सन्मानित करण्यात येईल. ही माहिती संस्थेचे अध्यक्ष आनंद गिरी मायालु यांनी दिली आहे.


## कवितेच्या लाटावर...





## कवितेच्या लाटावर...






## कवितेच्या लाटावर...






## कवितेच्या लाटावर...




हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559